# पशुसंवर्धन विभाग

## माहिती

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव** | पशुसंवर्धन विभाग |
| **विभाग प्रमुखाचे पदनाम** | पशुधन विकास अधिकारी |
| **विभागाचा दुरध्वनी क्रमांक** | 02521-220036 |
| **विभागाचा ई-मेल** | bdotalasari@gmail.com |

पशुसवंर्धन विभाग, ग्रामीण भागातील जनावरांच्या रोगांची लक्षणे, व त्यावरील प्रतिबंधात्मक लसीकरणाद्वारे उपाय योजना करणे, तसेच दुधाळ जनावरांचे पालन, दुग्धव्यवसायाकरिता प्रशिक्षण देणे व पशुसवंर्धन विभागाच्या विविध योजनांची माहिती व आधुनिक तंत्रज्ञान इ. विषयाची माहिती व प्रात्यक्षीक दाखवुन शेतक-यांना जनावरांची जोपासना चांगली करण्यांबाबत माहिती देणे हे या विभागामार्फत केल्या जाते. शासनाच्या पशुसवंर्धना संबंधीत विविध योजनांची अंमलबजावणी हा विभाग करीत असते. यामध्ये प्रामुख्याने, दुधाळ जनावरांचा गट वाटप, शेळी/मेंढी वाटप अंतर्गत अनुसूचित जाती-जमाती, सर्वसाधरण, दारीद्रयरेषेखालील, भुमिहीन जनतेला शासनाच्या योजनांचा लाभ या विभागामार्फत दिल्या जातो. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि. प. औरंगाबाद हे विभागाचे प्रमुख असून, निरनिराळ्या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतात. तसेच ते केंद्रस्तर व राज्यस्तर व जिल्हा परिषद उपकारमधून राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करतात.

महत्त्वाचे कार्य:

1)जि. प., राज्य शासन, केंद्र शासनातर्फे आयोजित योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे.

2)जनावरांसाठी रोग प्रतिबंधक व रोग नियंत्रणासाठी कार्यक्रम राबविणे. तसेच पशुवैद्यकीय सेवा पुरविणे.

3)ग्रामीण भागात पशुपालनातून रोजगार निर्मिती करणे.

4)कुक्कुटपालन, शेळी-मेंढी पालन तसेच विकास योजना राबविणे.

5) पशुपालन, पशुसंवर्धन, इ. चे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

पशूवैद्यकीय दवाखाने श्रे-१ व श्रे-२ यांच्या द्वारे विविध प्रकारची कृत्रिम रेतन, औषधोपचार, लसीकरण, खच्चीकरण, गर्भातपासणी वंध्यत्व तपासणी, संकरीत वासरांची पैदास, नमुने तपासणी, शस्त्रक्रिया इत्यादी स्वरूपाचे तांत्रिक कामकाज व शासकीय योजना राबविण्याचे कामकाज केले जाते. गट पातळीवर पशुधन विकास अधिकारी (वि) हे समन्वयक अधिकारी म्हणून शासनस्तर व जिल्हा परिषद स्तरावरील निरनिराळ्या योजना राबविण्याचे दृष्टीने पंचायत समिती त्या अंतर्गत असणारे दवाखान्याद्वारे गट विकास अधिकारी यांच्या वतीने योजना राबवतात.